रे. मु. नं. १३६/२०१२
सीएनआरनं.महापु.१८-०००२९९-२०१२

## निशाणी क्र. ८३ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी निशाणी ८० प्रमाणे झालेल्या आदेशाची पुर्तता न केल्यामुळे व विहीत मुदतीत दाव्यात दुरुस्ती न केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा निशाणी ८० कडील अर्ज दिनांक १७/०८/२०१९ रोजी पाचशे रुपयाच्या द्रव्य दंडावर मंजुर करण्यात येवुन वादींनी विहीत मुदतीत दुरुस्ती करावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल असा आदेश केलेला आहे. परंतु अनावधानाने व नजरचुकीने अदयाप आदेश झालेला नाही या गैरसमजुतीने त्या आदेशाप्रमाणे दुरुस्ती करण्याचे राहुन गेले. प्रस्तुतचा दावा हा करारनाम्यावरुन खरेदीखत करुन मिळणेकरिता हक्कज्ञापनाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. निशाणी ८० कडील आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केली नाही तर वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

२. प्रतिवादी तर्फे अर्जावरच म्हणणे देवुन अर्जातील कथने नाकारलेली आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, निशाणी ८० कडील आदेशाप्रमाणे मुदतीत दावा दुरुस्त करणे आवश्यक होते. परतु वादी यांनी त्याविषयी कोणतीही तजविज केली नाही. तसेच निशाणी ८० प्रमाणे दुरुस्ती करणे विलंब का झाला याचे योग्य कारण दिलेले नाही. निशाणी ८० कडील आदेश हा स्पष्ट आदेश आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. त्यांनी वैकल्पिकरित्या असे देखील म्हणणे दिले आहे की, अर्ज मंजुर करण्याचा झाल्यास वादी यांना जास्तीत जास्त दंड करण्यात यावा.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन, निरंतर मनाई व करारपत्रावरुन खरेदी दस्त करुन मिळण्याकरीता दाखल केल्याचे दिसुन येते. निशाणी ८० च्या अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र.१३ ते २० हे दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे त्यांना दाव्याच्या

कामी समाविष्ट करण्याकरीता वादींनी अर्ज दिला होता तो मंजुर झाला. सदर आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी विहीत मुदतीत दावा दुरुस्ती केली नाही तर प्रस्तुतचा आदेश रद्द समजण्यात येईल असा उल्लेख आहे. वादी यांनी विहीत मुदतीत दावा दुरुस्ती केली नाही. प्रस्तुत अर्जामध्ये वादी यांनी दिलेले कारण योग्य वाटत नाही. परंतु प्रस्तुतचा दावा हा खरेदीखत करुन मिळणेकरीता हक्कज्ञापन व निरंतर मनाई करीता असल्यामुळे तसेच दाव्याची व्दिरुक्ती व गुंतागुंत टाळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याचे झालेस जास्तीत जास्त द्रव्य दंडावर मंजुर करण्याविषयी प्रतिवादींनी युक्तीवाद केला तसेच म्हणणे देखील दिलेले आहेत. सबब या सर्व गोष्टींचा अवलोकनांचा विचार केला असता न्यायादानाचे दृष्टीने वादींचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. परंतु सदर अर्ज मंजुर करताना वादी यांनी विहीत मुदतीत दुरुस्ती केली नसल्यामुळे तो द्रव्य दंडावर मंजुर करणे आवश्यक आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज रक्कम रुपये १०००/– च्या द्रव्य दंडावर मंजुर करण्यात येतो.

**२.** निशाणी ८० कडील झालेल्या आदेशाप्रमाणे वादी यांनी सात दिवसामध्ये द्रव्य दंडाची रक्कम भरुन दाव्याची दुरुस्ती करण्याची आहे.

**३.** वादी यांनी निशाणी ८० कडे झालेल्या द्रव्य दंड रक्कम रुपये ५००/– व प्रस्तुत अर्जावरील द्रव्य दंड र.रुपये १०००/– असे एकुण १५००/– रुपये द्रव्य दंड भरण्याचे आहे.

दौंड
दिनांक – ०५.०२.२०२०

**(ए.ए.कळमकर)**
२रे सह दिवाणी न्यायालय दौंड,
जिल्हा पुणे

CERTIFIED

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : T.R.Bagwan |
| Court Name | : A.A.KALAMKAR |
| | : 2nd Joint Civil Judge, Jr.Dvn. Daund. |
| Date of Judgment | : 05.02.2020 |
| Judg. signed by P. O. | : 05.02.2020 |
| Uploaded on | : 05.02.2020 |